# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:03.11.2025** **वार:सोमवार**

---

1. भारतीय महिला क्रिकेट संघाची प्रथमच जगज्जेतेपदाला गवसणी; दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत विश्वचषकावर कोरलं नाव
2. इस्रोकडून सीएमएस- झीरो थ्री या देशाच्या सर्वाधिक वजनाच्या दूरसंवाद उपग्रहाचं यशस्वी प्रक्षेपण
3. क्लाउड फिजिक्समधील संशोधनासाठी पुण्यात उत्कृष्टता केंद्र उभारलं जाणार आणि
4. नाशिक आणि अमरावतीसाठी सी ट्रिपल आयटीला मंजूरी

**क्रिकेट**

आयसीसी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेवर 52 धावांनी दणदणीत मात करत भारतीय महिला संघानं प्रथमच विश्वचषकावर नाव कोरलं. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघानं ऐतिहासिक कामगिरी करत जगज्जेतेपदाला गवसणी घातली. ऐकुया अधिक वृत्तांत आमचे प्रतिनिधी प्रशांत जाधव यांच्याकडून.....

**पावसामुळे सामना दोन तास उशिरा सुरू झाला तरी भारतीय संघाने अत्यंत चिकाटीने आणि धीरोदात्त खेळ करत मुंबईतील डी वाय पाटील मैदानावर दक्षिण आफ्रिका संघाचा 52 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी शतकी भागीदारी केली. शफाली वर्मा आणि दीप्ती शर्मा यांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी 299 धावांचे आव्हान ठेवले. आफ्रिकेकडून कर्णधार लॉरा वुलव्हार्ड हिने शतक ठोकत चांगला प्रतिकार केला परंतु दीप्ती शर्माने तिला बाद करून मोठा अडथळा दूर केला. दक्षिण आफ्रिका संघ 246 धावा करू शकला. दीप्ती शर्माने सर्वाधिक 5 बळी घेतले. शिवाय तिने 58 चेंडूत 58 धावांचे योगदान दिले. तिला मालिकावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर शफाली वर्मा हिला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आय सी सी महिला क्रिकेट विश्वचषक पहिल्यांदा अमोल मुझुमदार या मराठमोळ्या प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली उंचावून भारतीय संघाने जबरदस्त ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अशी कामगिरी करणारा भारत हा चौथा संघ ठरला आहे. यापूर्वी ऑस्ट्रेलिया, इंग्लड आणि न्यूझीलंड या संघांनी ही कामगिरी केली होती. 25 वर्षानंतर भारतीय संघाला ही स्वप्न पूर्ती साध्य करता आली आहे. या विजयाने आज प्रत्येक भारतीयाचा ऊर अभिमानाने आणि आनंदाने भरून आला आहे.**

**अभिनंदन**

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या या विजयानंतर काल मध्यरात्री देशभरात विविध ठिकाणी जल्लोष साजरा करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुरमू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विजयानिमित्त भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे.

**पुरुष क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारत-ऑस्ट्रेलिया टी ट्वेंटी मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर 5 गडी राखून विजय मिळवला. या विजायमुळे भारतानं या मालिकेत 1-1 अशी बरोबरी साधली आहे.

**मॅरेथॉन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'फिट युवा फॉर विकसित भारत' या आवाहनाला प्रतिसाद देत पहिल्या खासदार क्रीडा महोत्सवाचा प्रारंभ कालपासून पुण्यात झाला. केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून हा महोत्सव होत आहे. हा महोत्सव येत्या 16 नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. या अंतर्गत शहरातील विविध मैदानांवर 35 प्रकारांच्या क्रीडा

स्पर्धा होणार आहेत. याची सुरुवात पुणे रन फॉर युनिटी या महामॅरेथॉनने झाली. यामध्ये आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन धावपटूंसह 20 हजारांहून अधिक धावपटूंनी भाग घेतला. मॅरेथॉननंतर माध्यमांशी संवाद साधताना केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले....

**केवळ विकासाच्या दृष्टीनं आपण पुढे जाणार नाही तर हा देश तंदुरुस्त झाला पाहिजे हा देश फिट झाला पाहिजे इथला युवा सक्षम झाला पाहिजे तो शक्तिशाली झाला पाहिजे आणि म्हणून फिट इंडिया मूव्हमेंट सुरू झाली आणि त्यातूनच खासदार क्रीडा महोत्सवाचा सुद्धा जन्म झाला मला आनंद वाटतो की या पुण्याची एक क्रीडा संस्कृती आहे ती सुद्धा या निमित्तानं आम्हाला समृद्ध करता येईल.**

**मुंबई क्रीडा महोत्सव**

उत्तर मुंबईतही केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते काल खासदार क्रीडा महोत्सवाचं उद्घाटन झालं. या अंतर्गत विविध खेळांच्या स्पर्धा संपूर्ण महिनाभर मुंबईत विविध ठिकाणी पार पडतील.

**इस्रो**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोनं सीएमएस झीरो थ्री या आतापर्यंतच्या सर्वात जास्त वजनाच्या उपग्रहाचं काल यशस्वी प्रक्षेपण केलं. भारतीय नौदलासाठी प्रक्षेपित केलेल्या या अत्याधुनिक दूरसंवाद उपग्रहामुळे नौदलाच्या अवकाश आधारित संवाद प्रणालीचं आणि सागरी क्षेत्रातील सतर्कते बाबतचं सामर्थ्य आणखी बळकट होईल. देशभरात तसंच आसपासच्या समुद्री क्षेत्रात दूरसंवादाचं सुरक्षित, बहुस्तरीय माध्यम यामुळे उपलब्ध झालं आहे.

**मिशन मौसम**

भविष्यात क्लाउड फिजिक्स अर्थात ढगांच्या विज्ञान संशोधनासाठी पुण्यात सेंटर ऑफ एक्सलन्स उभं करणार असल्याची माहिती केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉक्टर एम रविचंद्रन यांनी काल पुण्यात दिली. भारतीय उष्णप्रदेशीय हवामानशास्त्र संस्थेच्या वतीनं हवामान बदला विषयी अकराव्या जागतिक हवामान परिषदेचं आयोजन पुण्यात करण्यात आलं आहे; या परिषदेचं उद्घाटन काल झालं; त्यावेळी ते बोलत होते. या परिषदेत जगभरातले शास्त्रज्ञ सहभागी झाले असून हवामान शास्त्र बदलाचा अभ्यास, संशोधन, विकसित तंत्रज्ञान याविषयी विचार मंथन होणार आहे.

**सी-ट्रिपल आयटी केंद्र**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारानं आता नाशिक आणि अमरावती या दोन जिल्ह्यांना प्रत्येकी एक सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग म्हणजेच 'सी-ट्रिपल आयटी' केंद्र मंजूर करण्यात आलं आहे. उद्योग आणि कौशल्य विकास क्षेत्रात महाराष्ट्राला आघाडीवर ठेवण्याच्या प्रयत्नांचा हा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी काही दिवसांपूर्वी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून नाशिक आणि अमरावती जिल्ह्यांमध्ये सी-ट्रिपल आयटी उभारण्यासाठी सहकार्य करण्याचं आवाहन केलं होतं. या 'सीट्रिपलआय' केंद्रामुळे उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भ या दोनही भागातील युवकांना जागतिक दर्जाचं औद्योगिक प्रशिक्षण मिळणार आहे. तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य, आवश्यक प्रशिक्षण यासारख्या संधी आपल्या जिल्ह्यातच उपलब्ध होतील.

**कार्तिकी एकादशी**

कार्तिकी एकादशी निमित्त काल राज्यभरात विविध धार्मिक कार्यक्रमांच आयोजन करण्यात आलं होतं. पंढरपूरमध्ये विठूरायाच्या दर्शनासाठी लाखों भाविकांनी गर्दी केली होती.

**जत्रोत्सव-सिंधुदुर्ग**

भागवत एकादशीच्या मुहूर्तावर सिंधुदुर्गसह तळकोकणातल्या जत्रोत्सवाना सुरुवात झाली आहे. ऐकुया याबद्दलची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून....

**दशावतार आणि जत्रोत्सव हा तळकोकणचा आत्मा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासह गोवा राज्यातल्या अनेक गावांमध्ये देवस्थानचा जत्रोत्सव साजरा करण्याची प्रथा पूर्वापार सुरू आहे. पावसाळ्याचे चार महिने संपल्यावर शेती हंगामाचा समारोप करताना भागवत एकादशीच औचित्य साधत जत्रोत्सवांना सुरुवात होते. जत्रोत्सव आणि दशावतार हे नातं अनेक वर्षापासूनच**

**आहे. त्यामुळे दशावतार नाटकांना, ज्याला स्थानिक भाषेत धयकाले म्हंटलं जातं, त्यांना सुद्धा याच दिवसांपासून सुरुवात होते. आज जिल्ह्यात वेंगुर्ले तालुक्यात मोचेमाडचा गिरोबा, सावंतवाडी तालुक्यात बांद्याचा बांदेश्वर आणि कुडाळ तालुक्यातल्या आवळेगावच्या विठ्ठल रखुमाई देवस्थानचे जत्रोत्सव हे जिल्ह्यातले पहिले जत्रोत्सव सुरु होताहेत. त्यांनतर मे महिन्यापर्यंत विविध ठिकाणच्या मंदिरात हे जत्रोत्सव सुरु असतात. त्यामुळे साहजिकच या जत्रोत्सवांसोबतच दशावतारी नाटकांना देखील सुरुवात होतेय. पारंपरिक वेशभूषा, मंत्रमुग्ध करणारे वादनाचे सूर, आणि संपूर्ण मंदिर प्रांगणातल भक्तिमय वातावरण या सर्वांचा एक अविस्मरणीय संगम घडवून आणण्यासाठी दशावतारी मंडळ आणि कलाकार सज्ज झाले आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी.**

**एकादशी उत्सव**

जळगावचं ग्रामदैवत असलेल्या श्रीराम मंदिर संस्थानतर्फे काल कार्तिकी एकादशीनिमित्त श्रीराम रथोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. या रथोत्सवाचं यंदा 153वं वर्ष होतं. ध्वज, फुलांच्या माळा, विद्युत रोषणाईने सजलेल्या रथाचं ठिकठिकणी जल्लोषात स्वागत करण्यात आलं.

नंदुरबार जिल्ह्यातल्या नंदुरबार आणि नवापूर तालुक्यात खांडबारा आणि आजूबाजूच्या खेड्या-पाड्यांमध्ये आदिवासी कोकणी समाजाचा पारंपरिक डोंगऱ्यादेव उत्सवही काल भक्तिभावात आणि जल्लोषात साजरा झाला.

**संजीवन समाधी**

संत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळा येत्या 12 नोव्हेंबरपासून आळंदीत सुरू होत आहे. देऊळवाड्याच्या गुरू हैबत बाबांच्या पायरी पूजनानं या सोहळ्याला सुरुवात होणार आहे. या सोहळ्यातील कार्तिक एकादशीची मुख्य पहाट पूजा 15 नोव्हेंबरला तर माउलींचा संजीवन समाधी दिन सोहळा 17 नोव्हेंबरला होणार आहे.

**संगीत संमेलन-मुंबई**

67 व्या आकाशवाणी संगीत संमेलनाचं काल मुंबईत उद्धाटन झालं. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, आणि ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायक पद्मश्री पंडित वेंकटेश कुमार तसंच प्रसिद्ध भारूड कलाकार हामिद अमीन सय्यद आणि त्यांच्या पथकाने आपली कला सादर केली.

**माझी शाळा-सांगली**

सांगली जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानाचा तिसरा टप्पा आजपासून येत्या 7 फेब्रुवारीपर्यंत राबवण्यात येणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांनी 100 टक्के सहभाग घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे आणि शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांनी केल्या आहेत.

**हवामान**

राज्यात अनेक ठिकाणी पाऊस हजेरी लावत आहे. येत्या 24 तासात कोकणात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.